International Journal of Research in Economics and Social Sciences(IJRESS)
Available online at: http://euroasiapub.org
Vol. 12 Issue 07 July- 2022
ISSN: 2249-7382 | Impact Factor: 8.018|
(An open access scholarly, peer-reviewed, interdisciplinary, monthly, and fully refereed journal.)

# "मेळघाटातील आदिवासी मजूरांच्या हंगामी स्थलांतरणाची कारणमिमांसा एक समाजशास्त्रीय अध्ययन"

संदर्भ मेळघाट परिक्षेत्र धारणी व चिखलदरा तालुका

## संशोधनकर्ता
संदीप महादेवराव हाडोळे

## मार्गदर्शक
डॉ. अरूणसिंह धों. चौहान
एम.ए., एम.फिल., पीएच.डी., सहयोगी प्राध्यापक
विद्याभारती महाविद्यालय, अमरावती

**गोषवारा :** महाराष्ट्रातील केवळ विदर्भातच नव्हे तर भारताच्या मध्यप्रदेश, ओरीसा, बिहार, झारखंड अशा सर्वच पहाडी व जंगली भागात गोंड ही आदिवासी जमात वास्तव्यास असल्याचे दिसून येते. विदर्भातील गडचिरोली, यवतमाळ, अमरावती, वर्धा या जिल्हयात प्रामुख्याने गोंडांची वस्ती आहे. गोंड विदर्भातीलच नव्हे तर महाराष्ट्रच्या अनुसुचित जमातीमधील प्रमुख जमात आहे. गोंड, राजगोंड, माडीया गोंड, गोंडगवारी, कोमा, नागवंशी, वाडेभारिया, धोंण, धुलीया, कोलायुला यासारखे 55 विभिन्न नावाने संबोधल्या जाणाऱ्या उपजातीमध्ये विदर्भातील गोंड जमात विभाजीत झाली आहे. संशोधनामध्ये सर्वात महत्त्वाचा टप्पा असतो संशोधन पद्धतीचा वापर याकरिता प्राथमिक व दुय्यम माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे. प्राथमिक माहिती संकलित करताना मेळघाटपरिक्षेत्रांमधून 120 उत्तर दात्यांची निवड करून त्यांच्या मार्फत माहिती संकलित करण्यात आलेली आहे. दुय्यम माहिती संकलित करताना विविध शोधलेख, पुस्तके व इतर साहित्याचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**सुचक शब्द :** "आदिवासी , विकास , मेळघाट , ठेकेदार

International Journal of Research in Economics and Social Sciences(IJRESS)
Available online at: http://euroasiapub.org
Vol. 12 Issue 07 July- 2022
ISSN: 2249-7382 | Impact Factor: 8.018|
(An open access scholarly, peer-reviewed, interdisciplinary, monthly, and fully refereed journal.)

**प्रस्तावना :** भारतातील ज्या जमातींना आदिवासी म्हणुन ओळखल्या जाते. त्यापैकी गोंड ही एक जमात होय. गोंड या शब्दाची उत्पत्ती कोंड या शब्दाचा अपभ्रंश होवून निर्माण झाले असे हिस्लॉप मानतात. तेलगु भाषेतील कोंडा याचा अर्थ पर्वत किंवा पहाड असा होतो. या अर्थाने पर्वताच्या, पहाडाच्या आश्रयाने वास्तव्य करणारे व एका विशिष्ट धर्म संस्कृतीचे रक्षण करणारे लोक हे कोंड होत. पूढे त्याचा अपभ्रंश कोंड हा शब्दाऐवजी आता गोंड हे नाव हिंदुंनी त्या लोकांना दिले असल्याचा उल्लेख महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर मध्ये आढळतो. हिस्लॉपने गोंड लोकांचे वर्णन पूढीलप्रमाणे केले आहे. गोंड लोक सर्वसाधारणपणे माणसाच्या मानाने थोडे अधिक काळया वर्णाचे आहेत. गोंड ही शेतकरी जमात आहे. ते प्रामाणिक, हसतमुख, कणखर व साध्या राहणीमानाचे आहेत. गोंड जमातीमधील माडीया उपजमाती मधील लोक हे नृत्यकुशल असून, ते आनंदी स्वभावाचे व आतिथ्यशील आहेत. काम करण्यास ते नेहमी तत्पर असून सर्वसामान्य आदिवासींप्रमाणे आळशी शेतकरी नसतात. गोंड जमातीत आपसातील तंटे मिटविण्यासाठी व गुन्हयांचा निवाडा करण्यासाठी त्यांची स्वतःची परंपरागत पंचायत आहे. पंचायतीचा मुख्य सर्वानुमते निवडण्यात येतो. तो वंशपरंपरागत नसतो. महाराष्ट्रातील केवळ विदर्भातच नव्हे तर भारताच्या मध्यप्रदेश, ओरीसा, बिहार, झारखंड अशा सर्वच पहाडी व जंगली भागात गोंड ही आदिवासी जमात वास्तव्यास असल्याचे दिसून येते. विदर्भातील गडचिरोली, यवतमाळ, अमरावती, वर्धा या जिल्हयात प्रामुख्याने गोंडांची वस्ती आहे. गोंड विदर्भातीलच नव्हे तर महाराष्ट्रच्या अनुसुचित जमातीमधील ण्क प्रमुख जमात आहे. गोंड, राजगोंड, माडीया गोंड, गोंडगवारी, कोमा, नागवंशी, वाडेभारिया, धोंण, धुलीया, कोलायुला यासारखे 55 विभिन्न नावाने संबोधल्या जाणाऱ्या उपजातीमध्ये विदर्भातील गोंड जमात विभाजीत झाली आहे.

International Journal of Research in Economics and Social Sciences(IJRESS)
Available online at: http://euroasiapub.org
Vol. 12 Issue 07 July- 2022
ISSN: 2249-7382 | Impact Factor: 8.018|
(An open access scholarly, peer-reviewed, interdisciplinary, monthly, and fully refereed journal.)

## पूर्व संशोधनाचा आढावा :

**तेगमपूरे डॉ. मारूती (2009)** – डॉ. मारूती तेगमपूरे यांनी आपल्या ”आदिवासी विकास आणि वास्तव” या पुस्तकाव्दारे, आपल्या विविध प्रकरणांव्दारे आदिवासींच्या आर्थिक परिस्थितीचे आणि उप – योजनांचे सविस्तर विवेचन केलेले दिसून येते. या पुस्तकातील प्रकरणे पूढीलप्रमाणे आहेत –

1) आदिवासींच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा

2) किनवट तालुक्यातील आदिवासी

3) आदिवासी उप – योजना

4) आदिवासी उप – योजनांवरील खर्च

5) आदिवासी उप – योजनेचे परिणाम

वरील सर्व प्रकरणांव्दारे आदिवासींच्या आर्थिक परिस्थितीचे विवेचन करण्यात आले असून सदर पुस्तकाच्या प्रकरण एक ”आदिवासींच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा” या प्रकरणात, आदिवासीं कोणास म्हणावे, आदिवासींचे भारतीय स्वातंन्त्र्य लढयातील योगदान, अनुसुचित जमाती तथा आदिवासी संदर्भातील घटनात्मक तरतुदी,देशातील आदिवासींची सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती, महाराष्ट्रातील आदिवासींचे सामाजिक व आर्थिक जीवन, या विषयांवर डॉ. मारूती तेगमपूरे यांनी आपले अध्ययन केलेले आहे.

**संशोधन समस्या :** मेळघाट परिक्षेत्र येथे मूळ निवासी आदिवासी जमातीचे लोक मोठ्या संख्येने राहतात. रोजगाराची उपलब्धता कमी कालावधी करीत असल्यामुळे ते इतर राज्यांमध्ये स्थलांतरित होतात. याची कारणे शोधण्याचा प्रयत्न सदर शोध लेखामध्ये करण्यात आलेला आहे.

**संशोधनाचे उद्देश :**

- मेळघाटपरिक्षेत्रातील आदिवासी लोकांची संख्या व तेथील परिस्थितीचा अध्ययन करणे
- मेळघाट परिक्षेत्रातील रोजगारा संदर्भात माहिती प्राप्त करणे
- मेळघाट परिक्षेत्रातील स्थलांतराच्या कारणांचा शोध घेणे

**संशोधनाची गृहीत कृत्य :**

- मेळघाटपरिक्षेत्रामधील आदिवासी समाज अशिक्षित असल्यामुळे त्यांचे शोषण होत नाही आहे.
- मेळघाट परिक्षेत्रातील आदिवासी समाज अशिक्षित असल्यामुळे त्यांचे शोषण होत आहे.
- मेळघाटपरिक्षेत्रामधील आदिवासी समाज अशिक्षित व अडाणी पणाचा फायदा ठेकेदार घेत नाही आहे.
- मळेघाटपरिक्षेत्रामधील आदिवासी समाज अशिक्षित व अडाणीपणाचा फायदा ठेकेदार घेत आहे

**संशोधन पद्धती :** संशोधनामध्ये सर्वात महत्त्वाचा टप्पा असतो संशोधन पद्धतीचा वापर याकरिता प्राथमिक व दुय्यम माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे. प्राथमिक माहिती संकलित करताना मेळघाटपरिक्षेत्रांमधून 120 उत्तर दात्यांची निवड करून त्यांच्या मार्फत माहिती संकलित करण्यात आलेली आहे. दुय्यम माहिती संकलित करताना विविध शोधलेख, पुस्तके व इतर साहित्याचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**संशोधनाच्या मर्यादा :**

- संशोधनाचे परिक्षेत्र हे मेळघाट असून धारणी व चिखलदरा तालुक्यामधून प्राथमिक माहिती संकलित करण्यात आलेली आहे.
- संशोधनातून प्राप्त होणारे निष्कर्ष हे केवळ उपलब्ध माहितीच्या आधारे मांडण्यात आलेले आहे.

International Journal of Research in Economics and Social Sciences(IJRESS)
Available online at: http://euroasiapub.org
Vol. 12 Issue 07 July- 2022
ISSN: 2249-7382 | Impact Factor: 8.018|
(An open access scholarly, peer-reviewed, interdisciplinary, monthly, and fully refereed journal.)

## माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण :

1) हंगामाच्या काळात रोजगार उपलब्ध नसल्यामुळे आपण कामाकरिता स्थानांतरित होता काय ?

सारणी क्रमांक 1

| अनुक्रमांक | कामाकरिता मजुरांचे स्थलांतर | उत्तरदात्यांची मते | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | 120 | 100 |
| 2 | नाही | 0 | 0 |
| एकूण | | 120 | 100 |
| संदर्भ : प्राथमिक माहितीच्या आधारे | | | |

आलेख क्रमांक 1




वरील सारणी व आलेखावरून असे दिसून येते की, गावामध्ये रोजगार उपलब्ध नसल्यामुळे हंगामा काळात मजुरी करिता स्थानांतरित होणारे मजूर 120(100) उत्तरदात्यांनी आपली सहमती दर्शविली.

International Journal of Research in Economics and Social Sciences(IJRESS)
Available online at: http://euroasiapub.org
Vol. 12 Issue 07 July- 2022
ISSN: 2249-7382 | Impact Factor: 8.018|
(An open access scholarly, peer-reviewed, interdisciplinary, monthly, and fully refereed journal.)

2) अशिक्षित व अडाणीपणामुळे कामाच्या ठिकाणी आपले आर्थिक शोषण होते काय ?

सारणी क्रमांक 1

| अनुक्रमांक | आर्थिक शोषण होते | उत्तरदात्यांची मते | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | 114 | 95 |
| 2 | नाही | 6 | 5 |
| एकूण | | 120 | 100 |
| संदर्भ : प्राथमिक माहितीच्या आधारे | | | |

आलेख क्रमांक 2




वरील सारणी व आलेखावरून असे दिसून येते की, अशिक्षित व अडाणीपणामुळे कामाच्या ठिकाणी उत्तरदात्याच्या शोषणासंदर्भात प्राप्त सर्वाधिक मतांमध्ये 114(95) उत्तर दात्यांनी आपली सहमती दर्शविली. यावरून असे सिद्ध होते की अशिक्षित व अडाणीपणामुळे कामाच्या ठिकाणी स्थलांतरित मजुरांचे मोठ्या प्रमाणात शोषण होते.

3) कामाच्या ठिकाणी ठेकेदार आपल्या अशिक्षित पणाचा पुरेपूर फायदा घेतात काय ?

सारणी क्रमांक 3

| अनुक्रमांक | अशिक्षित पणाचा पुरेपूर फायदा घेतात | उत्तरदात्यांची मते | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | 103 | 86 |
| 2 | नाही | 17 | 14 |
| एकूण | | 120 | 100 |
| संदर्भ : प्राथमिक माहितीच्या आधारे | | | |

आलेख क्रमांक 2




वरील सारनी व आलेखावरून असे दिसून येते, कामाच्या ठिकाणी ठेकेदार त्यांच्या अशिक्षित पणाचा पुरेपूर फायदा संदर्भात सर्वाधिक प्राप्त मतांमध्ये 103(86) उत्तर दात्यांनी आपली सहमती दर्शविली यावरून असे सिद्ध होते की, शिक्षण नसल्यामुळे त्यांच्या साधेपणाचा फायदा घेऊन ठेकेदार त्यांचे शोषण करतात

**निष्कर्ष :** पश्चिम विदर्भातील मेळघाट परिक्षेत्र हे जंगलाने व्याप्त आहे ज्यामध्ये प्रामुख्याने चिखलदरा व धारणी या तालुक्यांचा समावेश होतो येथे आदिवासी समाज मोठ्या संख्येने राहत असल्याचे दिसून आलेले आहे परंतु अशिक्षित व अडाणीपणामुळे कामाच्या ठिकाणी त्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण होताना दिसून येते तसेच याचा फायदा जे ठेकेदार यांना काम देतात ते आर्थिक दृष्ट्या त्यांचे शोषण करून कमी मोबदला त्यांना देतात पर्याय नाही म्हणून तो ते स्वीकारून आपली उपजीविका जगतात अशी अवस्था मेळघाट परिक्षेत्रातील स्थानांतरित होणाऱ्या मजुरांची झाल्याचे सदर शोध लेखांमधून दिसून आलेले आहे. सदर शोध लेखांमध्ये मांडण्यात आलेले गृहीत कृत्य यांची पडताळणी करण्याकरिता सारणीच्या आधारे गृहीत कृत्य सिद्ध करण्यात आलेले आहे. ज्यामध्ये जो अल्टरनेटिव्ह हायपोथिसिस घेतलेला आहे तो सिलेक्ट होतो

# संदर्भ

1) Dharni, Amravati - Wikipedia
2) Chikhaldara - Wikipedia
3) तेगमपूरे, डॉ. मारूती प्रकाशन विश्वांभर कुलकर्णी, चिन्मय प्रकाशन, व्दारा, सवनेकर बिल्डींग, जिजामाता कॉलनी, पैठणगेट, औरंगाबाद पान नं. 9.12,14,15,16,30,31,32
4) बॅनर्जी बिस्वजीत – रूरल टु अर्बन माग्रेशन अॅन्ड द अर्बन लेबर मार्केट, हिमालया पब्लिशींग हाऊस नागपूर, 1986, पा नं. 257 ते 259)
5) कदम एस. डी – द डेव्हेलपमेंन्ट ट्रेंडस इन बीड डिस्ट्रीक्ट, एम फिल,लघुप्रबंध अप्रकाशित, गोखले इन्स्टिटयुट ऑफ पॉलिटिक्स ॲन्ड इकॉनॉमिक्स पूणे – 1979)